ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38

An International Peer Reviewed

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन संशोधन आढावा

**डॉ.कागदे शोभा विजयकुमार**

**प्राचार्य,**

**अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर,**

**पुणे-९**

**प्रा.बहिरट सारिका गौतम**


**असि.प्राध्यापक.**

**अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर,**

**पुणे-९**

**सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन**:- घटकाचे परीक्षण अध्ययनातील त्रूटी व त्यावरील उपाययोजना पूर्नमूल्यमापन तसेच विद्यार्थी व शिक्षकांना मिळालेले प्रत्याभरण याचा सातत्याने /सतत केलेला विचार म्हणजेच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होय.

अकारिक मूल्यमापनातंर्गत दिलेल्या आठ साधन तंत्राचा वापर करुन केलेले मूल्यमापन होय.




Continuous means regular assessment, frequency of unit testing, analysis of learning gaps, applying corrective measures, retesting and given feedback to teachers and students for self evaluation etc. comprehensive on the other hand attempts to cover both the scholastic and the co-scholastic aspects of the evaluation process being assessed through formative and summative assessment.

**★ सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्दतीमुळे काय साध्य होईल?**

- नियतमिपणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होईल.
- विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळेल.
- शैक्षणिक गुणवत्ता विकासास प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल.
- श्रेणी पध्दतीच्या अवलंबामुळे विद्यार्थ्यांची अनावश्यक तुलना कमी होईल.
- पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत माहिती मिळेल.
- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत गुणांच्या विकासाला चालना मिळेल.
- शिक्षकांच्या उपक्रमशीलतेला,प्रयोगशीलतेला,कल्पकतेला चालना मिळेल.
- विद्यार्थ्यांवरील दडपण कमी होऊन आनंददायी आणि ताण विरहीत शिक्षण होण्यास मदत होईल.
- कोणत्याही विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार नाही .
- शिक्षकांनाही आपल्या अध्यापनातील उणिवा लक्षात येवून त्या वेळीच दूर करण्याची संधी मिळेल.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासंदर्भात सद्यस्थितीत एम ए.,एम.फिल.,पी.एच.डी या स्तरावर कोणकोणती संशोधने झालेली आहेत.त्या संशोधनामध्ये संकलित मूल्यमापन की अकारिक मूल्यमापनासंबंधी काय कार्यवाही केली आहे व कोणती साधने किंवा तंत्रे विकसित केली आहेत का? शिक्षकांना, विद्यार्थ्यांना ,पालकांना ,मुख्याध्यापकांना ही प्रक्रिया राबविताना कोणत्या अडचणी आल्या होत्या याबाबत सर्व माहिती संबंधित आढाव्या दरम्यान घ्यावा लागतात.संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्त्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश घेणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार

घेवून त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी आणि उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदलेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा पाया भक्कम करणे म्हणजे संशोधन साहित्याचे परिशीलन होय.




**✶ संबंधित संशोधनाच्या आढाव्याचे महत्त्व:–**

१) संशोधन कर्त्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा अचूकपणे ठरविता येते.

२) विविध संशोधनात वापरलेल्या कसोट्या पध्दती लक्षात घेवून संशोधकाला स्वत:च्या संशोधनाविषयी कोणत्या पध्दती व कसोट्या वापरावयाच्या हे ठरविता येते.

३) निवडलेल्या संशोधन विषयासंबंधी या पूर्वी कोणती संशोधने झालेली आहेत व कोणती झालेली नाहीत याची माहिती मिळते.

४) पूर्वीच्या संशोधनात जे निष्कर्ष सिध्द झालेले आहेत त्याचा संशोधक करताना आधार घेता येतो.

५) माहिती सकंलनाची साधने , संख्याशास्त्रीय साधने ठरविणे शक्य होते.

६) संदर्भ साहित्यसूची, अहवाल लेखन इ. ची स्पष्ट कल्पना येते.

७) संशोधकाला स्वत:च्या संशोधनाची गुणवत्ता व दर्जा वढविता येतो.

८) संशोधन कार्याला योग्य ती दिशा मिळविण्यासाठी संदर्भ साहित्याचा आढावा घेणे महत्त्वपूर्ण ठरते.

## संबंधित आढावे

| संशोधकाचे नाव(वर्ष,स्तर) | विषय | पध्दती | उद्दिष्टे |
|---|---|---|---|
| नवले माधुरी गुलाब (पीएच.डी)१९९६ | इ.९वीच्या शास्त्रविषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षापध्दतीचा चिकित्सक अभ्यास | सर्वेक्षण पध्दत | १)सद्यस्थितीत शास्त्र विषयाच्या लेखी परीक्षा पध्दतीचा अभ्यास करणे.<br>२) सद्यस्थितीत शास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा पद्धतीचा अभ्यास करणे.<br>३) शास्त्र अध्यापनाच्या उद्दिष्टांपैकी लेखी परीक्षेद्वारे उपयोजन ,कौशल्य अभिरुची व वैज्ञानिक दृष्टीकोन ही उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होतात हे अभ्यासणे.<br>४) शास्त्र विषयाची सध्याची मूल्यमापन पध्दती कशी आहे याचा अभ्यास करणे.<br>५) निष्कर्षानुसार उपाययोजना सुचविणे काही उपययोजना पडताळून पाहणे. |
| गुरव मारुती गणपत (पीएच.डी)२००२ | महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षकांवरील कार्यभाराचा अभ्यास | सर्वेक्षण पध्दत | १) महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्हातील प्राथमिक शिक्षक करत असलेल्या शैक्षणिक व अशैक्षणिक कामांची माहिती घेणे.<br>२) विविध कार्यभारामुळे शिक्षक अध्यापनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.<br>३) शैक्षणिक व अशैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या कालावधीचा अभ्यास करणे.<br>४) प्राथमिक शिक्षकांची वरील कार्यभारासंबंधी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संबंधिताची मते जाणून घेणे.<br>५) सदर अभ्यासातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे नवीन कार्यभारांची मांडणी करणे. |
| भिलारे सविता प्रतापराव (पीएच.डी.) | प्राथमिक शिक्षण स्तरावरील सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीचा अभ्यास | सर्वेक्षण पध्दत | १) सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन योजनेची कार्यपध्दती अभ्यासणे.<br>२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही कशी होते याची माहिती मिळवणे.<br>३) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन योजना राबविताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.<br>४) सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापनाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे. |
| गंधे अच्युत प्रभाकर (पीएच .डी)२००० | माध्यमिक शाळांमध्ये जून १९९७ पासुन कार्यन्वित केलेल्या मूल्यशिक्षण योजनेच्या व परिपाठाच्या अहमदनगर जिल्हातील प्रत्यक्ष कार्यवाहीचा आढावा घेणे व मूल्यमापन करणे. | सर्वेक्षण पध्दत | १) मूल्यमापन परिपाठ या संकल्पनेची तात्विक बैठक अभ्यासणे.<br>२) मूल्यमापन परिपाठ योजनेबाबत महाराष्ट्र शासनाची कल्पना व अपेक्षा जाणून घेणे.<br>३) १९९७ ते १९९९ या दोन वर्षाच्या कालखंडातील प्रत्यक्ष अमंलबजावणीचा आढावा घेणे.<br>४) मूल्यमापन परिपाठ योजनेचे मूल्यमापन करणे.<br>५) मूल्यमापन परिपाठ योजनेच्या यशस्वी अमंलबजावणीसाठी उपाय सुचविणे. |

वरील संशोधनातून आलेले काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे :-

१) ज्ञान व आकलन या उद्दिष्टांवर अधिक भर दिलेला असतो.

२) प्रायोगिक कौशल्य योग्य प्रमाणात साध्य होत नाही.

३) मूल्यमापन पध्दतीत बदल आवश्यक आहे.

४) शास्त्र विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत बदल होणे गरजेचे आहे.

५) विद्यार्थी संख्या जास्त असल्याने शिक्षकांकडून योग्य प्रमाणात मूल्यमापन होत नाही.

६) मिळविलेल्या ज्ञानाचा नवीन परिस्थितीत विद्यार्थी उपयोग करु शकत नाहीत.

७) बहुतांश प्रतिसादकांच्या मते क्षमता चाचणीच्या नोंदी ठेवण्यामध्ये अडचणी येतात.

८) जास्तीत जास्त प्रतिसादकांच्या मते सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी नोंदवही १ व २ उपयुक्त आहे.

९) सध्याच्या प्राथमिक शाळांमधुन योग्य प्रमाणात अनुभवी शिक्षक आढळतात.

१०) प्राथमिक शिक्षकांवरील कार्यभार कमी करण्यासाठी १८ प्रकारचे विविध उपाय सुचवले.

११) सध्याच्या परिस्थितीत क्षमताधिष्टीत अध्यापनानुसार शिक्षकांनी अप्रगत विद्यार्थ्यांसाठी जादा सराव

करुन घेणे आवश्यक आहे परंतु त्यासाठी ज्यादा स्वतंत्र वेळ देण्याची मानसिकता शिक्षकाच्या जवळ

दिसून येत आहे.

वरील सर्व संशोधनातून शाळेमधे चालणाऱ्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेचे फायदे मर्यादा व त्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात येतात.

कोणत्याही गोष्टीच्या दोन बाजू असतात काही गुण असतात तर काही दोष परंतू हे दोष दूर करुन नवनवीन तंत्राचा वापर करुन अध्ययन – अध्यापन मूल्यमापन ही प्रक्रिया कशी चांगली होईल जेणेकरुन  विद्यार्थी ,शिक्षक व पालक यांच्या अडचणी दूर करणे शक्य होईल याबाबत विचार करणे गरजेचे आहे.

कोणताही नवीन प्रवाह आला की तो सहजासहजी मान्य केला जात नाही त्यास सर्व बांजूनी  विरोध केला जातो परंतू केवळ त्रुटीच पाहिल्या तर शिक्षण प्रक्रियेकडे पाहण्याचा सर्वाचांच दृष्टीकोन चुकीचा होईल.म्हणूनच या पध्दतीचे होणारे फायदे लक्षात घेता अध्ययन – अध्यापन मूल्यमापन ही प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी सर्वांनीच ती मान्य करुन तिची अमंलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी सहकार्यात्मक भावना उचलणे आवश्यक आहे.कारण या प्रक्रियेचा फायदा विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि पर्यायाने समाजाला होणार आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका प्रत,महाराष्ट्र राज्य शिक्षणिक संशोधक व प्रशिक्षक परिषद पुणे ३० सप्टेबर २०१०.

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक :पीआरई/ २०१०(१३६-१०)प्रशि-५ मंत्रालय विस्तार भवन,मुंबई - ३२ दिनांक २० ऑगस्ट २०१०.

३) डॉ.हकीम प्रभाकर,शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशो,नित्यनुतन प्रकाशन , पुणे -३० प्रथम आवृती २००८.

४) डॉ.भिंताडे,शैक्षणिक  संशोधन पध्दती नूतन प्रकाशन ,पुणे-३०

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES • 2012 • SRJIS